साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार
मो.नं. ९०९६९६८३४०
कार्यालय : ब्लॉक नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com
श्री. अकिल अहमद उर्फ गुड्डुभाई
नागपूर विभाग संपादक
मो.नं. ९११२२७४११००

दैनिक
# साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
epaper
www.sahsik.com




वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १३ | अंक : ५४ | सोमवार २६ ऑगस्ट २०१९ | मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार (पाटील) | (पृष्ठ -८) | मूल्य : ३ रुपये

### दिनविशेष

* श्रावणी सोमवार

शिवमूठ : जव



### सुविचार

कोणताही निर्णय लवकरात लवकर घेणे कधीही चांगलेच, परंतु तो घेत असतांना सखोल विचार मात्र करायलाच हवा.

### चारोळी

तुझ्या सोबतचे क्षण काही
दिवस मनातच राहतील,
जसे पावसाचे थेंब काही दिवस
रस्त्यावर नदीसारखे वाहतील

### हसा जरा जपून..

एक म्हातारी बाई रोज देवळात बसने जायची. ती ज्या बसने जायची त्या बस कंडक्टरला काजु खायला द्यायची.

एके दिवशी कंडक्टरने म्हातारीला विचारले, कि आजी मला तु रोज काजु-बदाम खायला का देते.

त्यावर म्हातारी म्हणाली, पोरा आता मी म्हातारी झाली आहे आणि त्यामुळे माझे दात पडलेत. त्यामुळे काजु-बदाम निसते चघळते महागाची वस्तु फेकायला परवडत नाही ना...!

**कंडक्टर अजूनपर्यंत उलट्या करीत बसला.**

# हजारो कोटींच्या घोटाळ्यात अजित पवार व इतर आरोपींना वाचविण्यासाठी गुन्हा नोंद करण्यास टाळाटाळ करून पदाचा दुरूपयोग करणारे कायद्याचे ज्ञान नसलेले

# मुंबई पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी विरूद्ध फौजदारी कारवाई



* मुंबई उच्च न्यायालयाने आदेशात उघड केला उपायुक्तांचा गैरकायदेशीरपणा व कायद्याचे अज्ञान
* त्वरीत बडतर्फ करून भा.द.वि. २१८, २०१, ४०९, ४२०, १२० (बी) आदी कलमाअंतर्गत फौजदारी कारवाईसाठी इंडियन बार असोसिएशन तर्फे तक्रार दाखल



*प्रतिनिधी/ २५ ऑगस्ट*

**मुंबई :** महाराष्ट्र बॅंकेच्या हजारो कोटींच्या घोटाळ्यात माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांसह इतर ७४ आरोपींना भादविच्या ४०९, ४२० (बी), ४१८, ४२३, ४२५, १०९, १२० (बी) आदी. गंभीर गुन्ह्यातून वाचविण्यासाठी गुन्हा नोंद करण्यास टाळाटाळ करणारे आणि आरोपींना वाचवीण्यासाठी कायद्यातील तरतूदींचा जाणिवपूर्वक गैरवापर करणारे, आरोपींच्या फायद्यासाठी कायदा सोईनूसार वाकवणारे आर्थिक गुन्हे शाखा मुंबईचे पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांना त्वरीत बडतर्फ करून त्यांच्याविरूद्ध भादवि २१८, २०१, १२० (बी), ४०९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमचे कलम १४५ (२) अंतर्गत कारवाई करण्याकरीता इंडियन बार असोसिएशनचे महाराष्ट्र-गोवाचे अध्यक्ष ॲड. विजय कुर्ले आणि मानव अधिकार सुरक्षा परिषदेचे राष्ट्रीय सचिव रशीद खान पठाण यांनी तक्रार दाखल केली आहे. तसेच या प्रकरणात पो. उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांच्याविरूद्ध कोर्ट अवमानना अंतर्गत सुद्धा कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेतील हजारो कोटींच्या घोटाळ्यासंबंधी नाबार्ड आणि रिझर्व्ह बॅंकेने केलेल्या चौकशीत अजीत पवारांसह इतर ७६ मोठ्या नेत्यांनी भ्रष्टाचार करून गंभीर फौजदारी गुन्हे केल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध झाले होते. त्याबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते सुरिंदर अरोरा यांनी आर्थिक गुन्हे शाखा मुंबई यांना २०१५ मध्येच सर्व पुराव्यानिशी तक्रार दिली होती. परंतू भ्रष्ट व अकार्यक्षम अश्या काही अधिकाऱ्यांनी दोषींना वाचविण्यासाठी प्रकरणात टाळाटाळ केली म्हणून अरोरा यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रं. ०६/२०१५ ही दाखल केली.

त्या याचिकेच्या सुनावणीमध्ये आर्थिक गुन्हे शाखा (ई.ओ.डब्ल्यू.) चे पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांनी आरोपींना कारवाईपासून वाचविण्यासाठी तक्रारीवर फौजदारी दखलपात्र गुन्हा निष्पन्न होत नसल्यामुळे एफआयआर नोंद केला नसल्याचे सांगीतले. त्यावर आपल्या ८४ पानी आदेशात उच्च न्यायालयाचे न्या. सत्यरंजन धर्माधिकारी व न्या. एस. के. शिंदे यांच्या खंडपीठाने पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांच्यावर कठोर शब्दात ताशेरे ओढून पाच दिवसाच्या आत अजित पवार व इतर ७६ आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिले.

उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाचे घटनापीठाने दिलेले आदेश, न्यायनिवाडे व फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम १५४, १५७ चा उल्लेख करून स्पष्ट केले की, पो. उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांनी नाबार्ड, रिझर्व्ह बॅंक आदींच्या चौकशी अहवालानंतरही

(उर्वरित पान २ वर)

# माजी केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली अनंतात विलीन

**दिल्लीतील निगम बोध घाट इथं जेटलींच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडले. जेटलींच्या अंत्यविधींसाठी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.**

*वृत्तसंस्था / २५ ऑगस्ट*

**नवी दिल्ली :** माजी केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली अनंतात विलीन झाले. त्यांचे पुत्र रोहन यांनी मुखाग्नी दिली. सर्वच पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी जेटलींच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं. काल दुपारी दिल्लीतील एम्स रुग्णालयात अरुण जेटलींनी अखेरचा श्वास घेतला होता.

दिल्लीतील निगम बोध घाट इथं जेटलींच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडले. जेटलींच्या अंत्यविधींसाठी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.



अरुण जेटली यांच्यावर एम्स रुग्णालयात उपचार सुरु होते. श्वसनाचा त्रास होत असल्याने आणि हृदयाचे ठोके वाढल्यामुळे जेटली यांना ९ ऑगस्ट रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. काही दिवसांपासून त्यांना लाईफ केअर सपोर्ट सिस्टमवर ठेवण्यात आले होते.

किडनी ट्रान्सप्लांटनंतर अरुण जेटली यांचा आजार बळावला होता. २०१९ च्या निवडणुकीत तर ते बाहेरही पडू शकले नाहीत. निवडणूक जिंकल्यानंतर पत्र लिहून जेटलींनी आपला मंत्रिमंडळात समावेश करु नये अशी विनंती केली. मोदींनीही ती मान्य केली. गेल्या १८ महिन्यांपासून मी आजारी आहे. माझी प्रकृती खराब आहे. यामुळे माझा मंत्रिपदासाठी विचार केला जाऊ नये, असं स्वत: जेटली यांनी ट्विटरद्वारे सांगितलं होतं.

# माझ्याविरोधात ईडी, सीबीआयची नोटीस काढून दाखवा

## सुप्रिया सुळेंचं सरकारला आव्हान




*विशेष प्रतिनिधी/ २५ ऑगस्ट*

**सोलापूर :** सरकार विरोधकांवर सूडबुद्धीने ईडी आणि सीबीआय कारवाई करत आहे, असे आरोप विरोधक करत आहेत. त्यामुळेच विरोधी पक्षातील नेते भाजप-शिवसेनेत जात असल्याचा आरोप होत आहे. एकीकडे विरोधकांमध्ये अशा कारवाईची भीती असताना राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी माझ्या विरोधात ईडी किंवा सीबीआयची नोटीस काढून दाखवावी, असं सरकारला आव्हान दिलं आहे.

मला पत्रकारांनी विचारलं की तुम्ही सरकारच्या विरोधात आवाज उठवत आहात, मात्र जर तुम्हाला ईडीची नोटीस आली तर आवाज उठवणार का? मी म्हणते की मला ईडी किंवा सीबीआयची नोटीस पाठवूनच दाखवावी, मी चॅलेन्ज देते. मी जर काही केलंच नाही तर मला कशाची नोटीस पाठवणार. सुरुवातीला थोडासा त्रास होईल. मात्र शेवटी मीच जिंकणार, असं म्हणत सुप्रिया सुळे म्हणाल्या सुप्रिया सुळे 'संवाद ताईंशी' या

(उर्वरित पान २ वर)

# नागपूर शहरात काळ्या पैशाच्या माध्यमातून

# 'संत्याचा' अवैध सावकारीचा गोरखधंदा



**हाच तो नागपूर पोलीसांना खिश्यात घेवून फिरणारा व व्याजाच्या वसुलीसाठी नागरीकांना गुंडांची धमकी देणारा अवैध सावकार 'संत्या' उर्फ संतोष फुलतांबेकर**

* अवैध सावकारीतील काळ्या पैशाच्या वसुलीसाठी ग्राहकांना देतो गुंडाकडून मारण्याची धमकी
* संत्याची नागपूर शहरात ५० ते ६० लाखांची अवैध सावकारी
* पाच वर्षाआधी झोपडपट्टीत किरायाने राहणाऱ्या संत्याजवळ करोडो रुपये आलेत कोठून..?
* संत्याची अवैध सावकारी जोमात, संबंधित विभाग कोमात

*प्रतिनिधी/ २५ ऑगस्ट*

**नागपूर :** शहरातील **'संत्या'** नामक अवैध सावकाराने काळ्या पैशाच्या माध्यमातून अव्वाच्या सव्वा व्याजदराने आपला अवैध सावकारीचा गोरखधंदा नागपूर शहरात सुरू केला असून व्याजाच्या वसुलीसाठी त्याच्याकडून ग्राहकांना जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याने शहरात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे. शहरात आधीच हत्याकांडाचे एकामागून एक प्रकार घडत असताना अवैध सावकार **'संत्या'** उर्फ संतोष फुलतांबेकर हा पोलीस प्रशासनासाठी नव्याने डोकेदुखी तर ठरणार नाही ना..? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरातील सध्याचा विना परवाना अवैध सावकार **'संत्या'** हा पाच वर्षाआधी झोपडपट्टीत किरायाच्या खोलीत राहायचा. एका पुस्तकाच्या दुकानात काम करून आपल्या दोन वेळच्या भाकरीची कशीबशी सोय करायचा. मात्र या पाच वर्षांच्या काळात त्याच्या हातात अशी कोणती सोन्याचे अंडे देणारी कोबंडी लागली की संत्याने चक्क दोन मजली टुमदार बंगल्यासह नागपूर शहरात दोन-दोन प्लॉट खरेदी केले. एवढेच नाही तर शहरात त्याने काळ्या पैशाच्या माध्यमातून चक्क ५० ते ६० लाख रुपयांच्या अवैध सावकारीची विना परवाना दुकानदारी थाटली आहे.

संतोष फुलतांबेकर हा मदत म्हणून लोकांना आधी पैसे देतो व नंतर त्या मदतीच्या पैश्यावर दर महिन्याला १०, २०, ३० टक्के व्याजदराने व्याज आकारून पैशासाठी वेठीस धरतो. एखाद्या सर्वसामान्य माणूस व्याजाचे पैसे देण्यास असमर्थ ठरला तर **'संत्या'** त्याला गुंडाकडून मारण्याची धमकी देतो. या अशाप्रकारच्या काळ्या पैशाच्या सावकारीच्या माध्यमातून संत्याने अनेक गोरगरीब नागरिकांचे सोनेनाणे व मालमत्ता हडप केल्या आहेत. अशा पद्धतीने पाच वर्षाआधी पुस्तकाच्या दुकानात काम करून झोपडीत राहणाऱ्या संत्याने करोडो रुपयांची संपत्ती गोळा केली आहे.

सावकारीचा कोणताही परवाना नसताना काळ्या पैशाच्या वसुलीसाठी **'संत्या'** हा नागरिकांना गुंडाची धमकी तर देतोच शिवाय **'मै तुम्हारी हालत खराब कर दुंगा, पुलिस मेरा कुछ नही बिघाड पायेगी'** अशा प्रकारे पोलीस प्रशासनाला जसा काही खिशात घेऊन फिरतो की काय अशा तोऱ्यात शहरात मिरवित असतो. नागपूर पोलिसांनी या अवैध सावकारावर कारवाई करून त्याच्या मुसक्या जर आवळल्या तर कदाचित एक काळ्या पैशाचे मोठे रॅकेट त्यांच्या हाती लागू शकते अशा प्रकारची चर्चा शहरात दबक्या आवाजात सुरू आहे.

ज्याच्याकडे पाच वर्षाआधी राहायला घर नाही आणि खायला भाकरी नाही अशी अवस्था असलेल्या संतोष उर्फ **'संत्या'** फुलतांबेकर याच्याकडे सावकारी करण्याइतपत करोड रुपया नेमका आला कोठून हा प्रश्न देखील पोलीस विभाग, निबंधक कार्यालय व आयकर विभागासाठी संशोधनाचा विषय ठरु शकतो यात तिळमात्र शंका नाही.

(क्रमशः)